# प्रेसनोट

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर
दि.१८/०६/२०२६

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक /अहिल्यानगर. |
| पोलीस ठाणे, गुन्हा नोंद क्रमांक | श्रीगोंदा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |
| कलम व गुन्हा दाखल दिनांक | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७,१२ प्रमाणे |
| आरोपीचे लोकसेवक नाव, वय व कार्यालय | १) नितीन अशोक गाडगे, वय – ४४ वर्ष, पोहेकॉ/५००,नेम –श्रीगोंदापोस्टे, रा. पंतनगर, कम्युनिटिहॉलजवळश्रीगोंदा, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर.<br>२) राजेश रावसाहेब जाधव,वय–३८ वर्षे,पोकॉ/११९५,नेम–श्रीगोदा पोलीस स्टेशन,रा.अवधुतनगर,मांडवगण रोड,श्रीगोंदा,ता.श्रीगोंदा,जि.अहिल्यानगर.<br>३) दादाराम शिवराम म्हस्के, वय – ५६ वर्ष, चालक पोकॉ/१०३१,नेम –श्रीगोंदा पोस्टे, रा. चांदगांव, ता. श्रीगोंदा. जि. अहिल्यानगर. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ७,०००/– रूपये. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ७,०००/– रूपये |

## थोडक्यात हकिकत:–

प्रस्तुत बातमीतील हकिकत अशी की,तक्रारदार यांचे भावाचा दिनांक ०१/०६/२०२६ रोजी अपघात झाला होता व त्यांना पाटिल हॉस्पीटल,दौंड,जि.पुणे येथे उपचाराकरीता दाखल केले होते.त्यावेळी दौंड पोलीसांनी तक्रारदार यांचे भावाचा जबाब नोंदवुन सदर अपघात प्रकरण श्रीगोदा पोलीस स्टेशन येथे पुढील कारवाई करीता पाठविले होते.सदरचे अपघात प्रकरण आलोसे क्र.१ नितीन गाडगे यांचेकडे प्रलंबित होते. तक्रारदार यांनी भावाचे अपघातामध्ये गुन्हा दाखल करणेकामी आलोसे क्र.१ नितीन गाडगे यांची भेट घेतली होती त्यावेळी आलोसे क्र.१ नितीन गाडगे यांनी त्यांचे मतदनीस व अपघाताची माहिति **iRAD** ॲप्लीकेशन मध्ये भरणारे आलोसे क्र.२ राजेश जाधव यांची भेट घेण्यास सांगितली त्याप्रमाणे तक्रारदार यांनी आलोसे क्र. २ राजेश जाधव यांची भेट घेतली असता आलोसे क्र.२ राजेश जाधव यांनी तक्रारदार यांचे भावाच्या अपघाताचे ठिकाणाची माहिति **iRAD** ॲप्लीकेशन मध्ये भरून अपघातामध्ये गुन्हा दाखल करण्यासाठी स्वत:करीता व आलोसे क्र.१ नितीन गाडगे यांचेकरीता १०,०००/– रू.लाचेची मागणी केल्याची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर येथे दिनांक १४/०६/२०२६ रोजी प्राप्त होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीप्रमाणे दिनांक १६/०६/२०२६ रोजी लाच मागणी पडताळणी वेळी तक्रारदार यांनी आलोसे क्र.१ नितीन गाडगे यांची भेट घेतली असता आलोसे क्र.१ नितीन गाडगे यांनी तक्रारदार यांचेकडे भावाच्या अपघाताचे ठिकाणाची माहिति **iRAD** ॲप्लीकेशन मध्ये भरून अपघातामध्ये गुन्हा दाखल करण्यासाठी तडजोडीअंती ७०००/– रू.लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले तसेच दिनांक १८/०६/२०२६ रोजी लाच मागणी पडताळणी दरम्यान तक्रारदार यांनी आलोसे क्र.१ नितीन गाडगे यांचे मदतनीस तसेच अपघाताची माहिति **iRAD** ॲप्लीकेशन मध्ये भरण्याचे काम पाहणारे आलोसे क्र.२ राजेश जाधव यांची भेट घेतली असता आलोसे क्र.२ राजेश जाधव यांनी तक्रारदार यांचे भावाचे अपघाताची माहिति **iRAD** ॲप्लीकेशन भरण्याचे काम करणे अपेक्षित असताना तक्रारदार यांना उद्देशपुर्वक श्रीगोंदा पोलीस स्टेशनमधील शासकिय वाहनावरील चालक आलोसे क्र.३ दादाराम म्हस्के यांना सदर कामासंदर्भात अधिकार नसताना त्यांची भेट घेण्यास सांगितली. तक्रारदार यांनी आलोसे क्र.२ राजेश जाधव यांचे सांगणेप्रमाणे आलोसे क्र.३ दादाराम म्हस्के यांची भेट घेतली असता आलोसे क्र.३ दादाराम म्हस्के यांनी आलोसे क्र.१ यांनी मागितल्याप्रमाणे ७,०००/– रूपये लाचेची मागणी करून सदर लाच रक्कम स्विकारण्याची संमती दर्शवली व दिनांक १८/०६/२०२६ रोजी आयोजित सापळा कारवाई दरम्यान आलोसे क्र.३ दादाराम म्हस्के यांनी सदर ७,०००/– रू.लाच रक्कम स्विकारली आहे.

**१) सापळा अधिकारी:–** पोलीस निरीक्षक श्री, राजु आल्हाट,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर

**२) पर्यवेक्षण अधिकारी:–** पोलीस उप अधिक्षक श्री.अजित त्रिपुटे,मो.नं. ८३२९७०१३४४

**३) सापळा पथक:–** १) पोना/७०९ चंद्रकांत भिमसेन काळे २) पोकॉ/२५७९ किशोर विठठल कुळधर ३) पोकॉ/२२६२ शेखर बाळासाहेब वाघ ४) चालक पोहेकॉ/दशरथ भिमराव लाड सर्व नेम– ला.प्र.वि. अहिल्यानगर

**४) तपासी अधिकारी:–** पोलीस उप अधीक्षक श्री.अजित त्रिपुटे,मो.नं.८३२९७०१३४४

मार्गदर्शन

**१) मा.श्री.भारत तांगडे पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक**

२) मा.श्री.माधव रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक.

३) मा.श्री.सुनिल दोरगे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना अहवान करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाचमागणाऱ्या लोकसेवका बद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ताः— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, टि.व्ही सेंटर समोर, सावेडी, अहिल्यानगर.

संकेत स्थळः– acb.maharashtra.gov.in

ई मेलः– spacbnashik@mahapolice.gov.in, dyspacba.nagar @ gmail.com

ऑनलाईन तक्रारः– :– acbmaharashtra.net दुरध्वनी कः– 0241–02423677

टोल फ्री कः– 1064 व्हॉटस अप कमांकः– 9168641064

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नाशिक — वॉट्स अप कमांक ९५४५६५१०६४
लाचलुचपत प्रतिंबंधक विभाग,जळगाव — वॉट्स अप कमांक ७५८८६६१०६४
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे — वॉट्स अप कमांक ७७९८१६१०६४
लाचलुचपत प्रतिबंध विभाग,नंदुरबार — वॉट्स अप कमांक ९४२३५४१०६४